**प्रेसनोट दिनांक ०१/०७/२०२३ पोलीस ठाणे :- पिंपरी**

**दोन वर्षापासुन फरार असलेल्या मोक्यात व इतर दोन गुन्ह्यात पाहिजे आरोपीच्या पिंपरी पोलीसांनी आवळल्या मुसक्या.**

दिनांक २७/०६/२०२३ रोजी पिंपरी पोलीस ठाणे मधील तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी व्हिजीबल पेट्रोलिंग करण्याबाबत आदेशित करण्यात आल्याने पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना बातमीदारा मार्फत माहिती मिळाळी की, दोन वर्षापासुन मोक्यात फरार असलेला सराईत गुन्हेगार नामे अमित भुरेलाल सौदे, वय २५ वर्षे, रा. आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे हा बौध्दनगर येथे त्याचे घरच्यांना भेटण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने पोलीस उप निरीक्षक अनिरुध्द सावर्डे यांनी लागलीच सदर बातमी बाबत मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राम राजमाने सो, पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांना फोनवर कळविली असता, मा. वपोनि सो यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे दोन टिम तयार करुन टिम क्रं. १ हे बौध्दनगर येथील कमानी पाशी व टिम क्रं. २ ही बौध्दनगर येथील मोकळया मैदानात वेगवेगळीकडे सापळा रचुन थांबले. त्यानंतर थोडया वेळाने बामती प्रमाणे अमित भुरेलाल सौदे, वय २५ वर्षे, रा. आंबेडकर कॉलनी, रिव्हर रोड, पिंपरी, पुणे हा तेथे आला असता त्यास आम्ही सर्वजण ओळखत असल्याने पोलीस उप निरीक्षक सावर्डे व पोलीस उप निरीक्षक शाकीर जिनेडी यांनी इशारा केला तेव्हा आम्ही सर्व स्टाफ यांनी त्यास दिनांक २७/०६/२०२३ रोजी १९:३० वा. ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता पिंपरी पोलीस ठाणे येथे आणले. सदरचा आरोपी हा पिंपरी पोलीस ठाणे कडील गुन्हा रजि. क्रं. १) ८१४/२०२१, भा.दं.वि. कलम ३९७, ३४१, ५०४, ५०६, क्रिमीनल लॉ अॅमेनमेंट अॅक्ट ३, ७ व महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(४), २) ६८०/२०२१ भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ४५२, ४२७, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, आर्म अॅक्ट ४(२५), महापोका ३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ.अॅ.अॅ. ३, ७ ३) ३७०/२०२१ भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ या गुन्ह्यात पाहिजे आरोपी आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ. संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी अपर, पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, मा.श्री. विवेक पाटील, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- १, पिंपरी चिंचवड, मा. श्री. सतीश कसबे, सहायक पोलीस आयुक्त सो, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड, श्री. राम राजमाने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक व श्रीमती रूपाली बोबडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे, शाकिर जिनेडी, पो.हवा. राजेंद्र बारशिंगे, पो.हवा. शांताराम हांडे, पो.ना. जावेद बागसिराज, गणेश करपे, सोमेश्वर महाडीक, ओंकार बंड, पो.शि. समीर ढवळे व दत्ताजी कवठेकर यांनी केली आहे.

( राम राजमाने )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
पिंपरी पोलीस ठाणे, पिं.चिं.

Scanned with CamScanner